के.के.वाघ शिक्षण संस्था संचालित,

# के.के.वाघ कला,वाणिज्य,विज्ञान व संगणक विज्ञान महाविद्यालय, चांदोरी ,

ता.निफाड,जि.नाशिक ४२२२०१

---

**शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील शिष्यवृत्ती अर्ज भरणेसंबंधी**

**महत्वाची सूचना** दि.२२/०९/२०२६

महाविद्यालयात प्रवेशित कला,वाणिज्य,विज्ञान तसेच संगणक विज्ञान शाखेतील सर्व प्रवर्गातील शिष्यवृत्तीसाठी पात्र असणा-या विद्यार्थ्यांना कळविण्यात येते शिष्यवृत्ती अर्ज भरण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

- SC/ST/EBC/RSM शिष्यवृत्ती व फ्रीशिप करिता **महाडीबीटी २.०** या वेबसाईटवर शिष्यवृत्ती/फ्रीशिप करिता अर्ज करावा.
- तसेच OBC/VJNT प्रवर्गातील फ्रीशिप **(ज्या विद्यार्थ्यांच्या पालकाचे उत्पन्न २,००,०००/- रु.पेक्षा जास्त असेल अशा विद्यार्थ्यांकडे** Non Creamy Layer **नसेल त्या विद्यार्थ्यांनी)** करिता महाआयडी तयार करावा लागेल. व वरील विद्यार्थ्यांनी **महाडीबीटी २.० या वेबसाईटवर शिष्यवृत्ती/फ्रीशिप करिता अर्ज करावा.**
- **OBC/VJNT/SEBC/SBC** या प्रवर्गातील शिष्यवृत्ती करिता (ज्या विद्यार्थ्यांच्या पालकाचे उत्पन्न २,००,०००/- रु.पेक्षा कमी असेल त्यांनी शिष्यवृत्ती अर्ज भरण्यापूर्वी Non Creamy Layer काढून घ्यावे. ज्या विद्यार्थ्यांकडे Non Creamy Layer **आहे** त्या विद्यार्थ्यांनी) विद्यार्थ्यांनी **एनएसपी या वेबसाईटवर** शिष्यवृत्ती करिता अर्ज करावा.

महाआयडी मिळवण्यासाठी, तुम्ही तुमच्या आधार कार्डचा वापर करून अधिकृत महासारथी या पोर्टलवर ऑनलाइन नोंदणी करू शकता .

महाआयडी तयार करण्याची आणि डाउनलोड करण्याची प्रक्रिया खालीलप्रमाणे प्रमाणे आहे.

- महासारथी या वेबसाइटला भेट द्या: आपल्या मोबाईल फोन किंवा संगणकावरमहासारथी पोर्टल उघडा .
- आधार पडताळणी: तुमचा आधार क्रमांक प्रविष्ट करा आणि तुमच्या लिंक केलेल्या मोबाईल नंबरवर पाठवलेली ओटीपी पडताळणी पूर्ण करा.
- तपशील भरा: तुमचा कार्यरत मोबाईल नंबर द्या आणि आवश्यक वैयक्तिक माहिती भरा.
- सादर करा: नोंदणी अर्ज सादर करा.
- लॉगिन आणि डाउनलोड: सुमारे २४ तास प्रतीक्षा करा, त्यानंतर तुमचे डिजिटल महा आयडी कार्ड PDF डाउनलोड करण्यासाठी तुमचा आधार आणि OTP वापरून पोर्टलवर पुन्हा लॉगिन करा.

तसेच शैक्षणिक वर्ष २०२६-२७ या वर्षात महाविद्यालयात प्रथम वर्ष (कला(FYBA), वाणिज्य(FYBCOM), विज्ञान(FYBSC) व संगणक विज्ञान(FYBCS)) या वर्गात प्रवेशित विद्यार्थ्यांनी आयसीआयसीआय बँकेत खाते उघडण्यासाठी रु.२६५.५०/- (दोनशे पासष्ट रुपये पन्नास पैसे इ.)आपल्या mentor/मेंटॉर कडे दि.२१-०९-२०२६ पर्यंत जमा करावेत

* सर्व विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती/फ्रीशीपचे फॉर्म दि. ३०/०९/२०२६ पर्यंत भरणे व महाविद्यालयात जमा करणे सक्तीचेच आहे.

डॉ.एस.के.देवरे

प्राचार्य

के. के. वाघ कला, वाणिज्य, विज्ञान व संगणक विज्ञान महाविद्यालय, चांदोरी